पुढारी

# न्यू पॅलेस शाळेत वाचन प्रेरणा दिन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नाईक मळा येथील न्यू पॅलेस शाळेत डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्म दिवस 'वाचन प्रेरणा दिन' मोठ्या उत्साहात झाला. करवीर काशी फाऊंडेशनच्या वतीने शालेय निरोप समारंभ पुस्तकाच्या १०० प्रती शाळेस भेट देण्यात आल्या, तसेच शिवाजी विद्यापीठाचे गणित विभागप्रमुख डॉ. प्रा. सरिता ठकार यांनी ४०० पुस्तके भेट दिली.

दिवसभर विद्यार्थ्यांनी 'अग्निपंख', 'श्यामची आई', 'विद्यार्थ्यांसाठी बारा संस्कार', 'फास्टर फेणे', 'मदर तेरेसा' आदी पुस्तकांच्या वाचनाचा आनंद लुटला. यावेळी सुनीता आंबर्डेकर, वैशाली पाटील, सुनीलकुमार सरनाईक, शिक्षक संघाचे राज्य प्रतिनिधी अजितकुमार पाटील, प्रशासन अधिकारी एस. के. यादव शिक्षक संघाचे शहराध्यक्ष मनोहर सरगर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक विमल जाधव यांनी स्वागत केले. यावेळी शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी यामध्ये सहभाग घेऊन वाचन प्रेरणा दिन साजरा केला.

# २० ऑक्टोबरला महिलांसाठी पिंकथॉन मॅरेथॉन स्पर्धा

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

महिलांच्या आरोग्यासाठी 'पिंकथॉन' ही तीन कि.मी. अंतराची मॅरेथॉन स्पर्धा रविवारी (ता. २०) सकाळी सहा वाजता शिवाजी विद्यापीठ परिसरात होणार आहे. मॅरेथॉनचे यंदाचे दुसरे वर्ष आहे. स्पर्धेत ३५० महिलांनी सहभाग नोंदविल्याची माहिती संयोजक सुमित्रा खानविलकर यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

उद्घाटनप्रसंगी हाफ आयर्न वुमन मयुरा शिरवाळकर, आंतराष्ट्रीय नेमबाजपटू राही सरनोबत, महाराष्ट्राची पहिली आयर्न वुमन सुप्रिया निंबाळकर, आदी प्रमुख उपस्थिती राहणार आहेत. दरम्यान, मॅरेथॉनमध्ये महिलांना कुटुंबासह सहभाग नोंदविता येईल.

खानविलकर म्हणाल्या, 'यापूर्वी महिला हळदी-कुंकूसारख्या पारंपरिक कार्यक्रमाच्या निमित्ताने घराबाहेर पडत होत्या. बदलत्या युगात महिलाही नोकरी करून कुटुंबाला आर्थिक हातभार लावतात. अलीकडे महिलांचे आरोग्याकडे दुर्लक्ष होते. त्यांना व्यायामाची आवड लागावी, आरोग्य सदृढ बनावे, शारीरिक, बौद्धिक मानसिकदृष्ट्या त्या सक्षम बनाव्यात यासाठी पिंकथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. वर्षभर महिन्यातील प्रत्येक शनिवारी शिवाजी विद्यापीठ परिसरात आरोग्य, व्यायाम, योग, सायकलिंग, रनिंग, जलद चालणे, आदींविषयी विनामूल्य कार्यशाळा घेण्यात येते.'

पत्रकार परिषदेस आरती संघवी, गीता लालवाणी, भाविका दुलानी, मंजिरी हसबनीस उपस्थित होत्या.

# जे जे चांगले आहे, ते वाचलेच पाहिजे : डॉ. शिर्के

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

ग्रंथालयात वेगवेगळ्या प्रकारची, वेगवेगळ्या विषयांची पुस्तके असतात. आपल्या आवडीप्रमाणे, वेळेप्रमाणे, सवडीप्रमाणे ती पुस्तके वाचली पाहिजेत, चाळली पाहिजेत. किंबहुना जे जे चांगले आहे, ते प्रत्येकाने वाचलेच पाहिजे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले. करवीर नगर वाचन मंदिर आणि बहुउद्देशीय वाचनकट्टा व राज्य मराठी विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने करवीर नगर वाचन मंदिर येथे 'वाचन प्रेरणादिन - अभिवाचन उपक्रम' कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प्रमुख उद्घाटक म्हणून ते बोलत होते.

यावेळी प्राथमिक शिक्षण समितीचे विजय माळी, वाचनकट्टा प्रमुख एस. डी. पाटील विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. वैदेही जोशी, संस्थेचे उपाध्यक्ष नंदकुमार मराठे, हिशेब तपासनीस दीपक गाडवे, कार्यवाह सतीश कुलकर्णी, संचालक उदय सांगवडेकर, मनीषा वाडीकर, राज्य मराठी विकास संस्थेचे समन्वयक दत्तात्रय डवण तसेच अपूर्वा खांडेकर, तनया सुतार, आरजू बारगीर उपस्थित होते.

वैशाली माने यांनी शिशुविहार शाळेच्या मुलांशी गोष्टीरूपी संवाद साधत वाचनाचे महत्त्व विशद केले. सूत्रसंचालन ग्रंथपाल मनीषा शेणई यांनी केले. प्रास्ताविक वाचनकट्टा संकल्पक युवराज कदम यांनी केले. आभार अश्विनी वळिवडेकर यांनी मानले.



शिवाजी विद्यापीठात विविध फेलोशिपप्राप्त संशोधक विद्यार्थ्यांसमवेत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. पी.एस. पाटील.

# 'संशोधन सामाजिक व्हावे'

कोल्हापूर टाइम्स टीम

'आपल्या संशोधनाने एकूण सामाजिक ज्ञानामध्ये नेमकी काय भर टाकली, कोणते योगदान दिले, या बाबीकडे संशोधकांनी गांभीर्यपूर्वक लक्ष देण्याची गरज आहे' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील ४८ संशोधक विद्यार्थ्यांची महाराष्ट्र सरकारच्या छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेतर्फे (सारथी) विविध फेलोशीपसाठी निवड झाली. विद्यापीठातर्फे या विद्यार्थ्यांसह अन्य



## सारथी फेलोशिपप्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार

विविध योजनांखाली फेलोशीपप्राप्त ५७ विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ राजर्षी शाहू सभागृहात झाला.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, 'संशोधक विद्यार्थ्यांसमवेत त्रैमासिक बैठका घेण्यात येतील. त्यासाठी सिंगल विंडो सदृश काही व्यवस्था निर्माण करता येईल का, या दृष्टीनेही चाचपणी करता येईल.' अरविंद पाटील (भौतिकशास्त्र) व प्रवीण शेंबडे (भूगोल) या संशोधक विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. विज्ञान व तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील यांनी स्वागत केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. उपकुलसचिव संजय कुबल यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालये व विद्यापीठ विभागाने याचे संयोजन केले.

लोकमत

# विद्यापीठाचे महिला सबलीकरणाचे पाऊल

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील डिपार्टमेंट ऑफ फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी आणि छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस एज्युकेशन अँड रिसर्च (सायबर) संचलित कॉलेज ऑफ नॉन-कन्व्हेन्शनल व्होकेशनल कोर्सेस फॉर वुमेन यांच्यामध्ये शैक्षणिक सामंजस्य करार झाला. त्याचा कालावधी पाच वर्षांचा आहे.

या कराराअंतर्गत राष्ट्रीय परिषद आयोजन, सर्टिफिकेट कोर्सेस (वॉटर क्वालिटी स्टँडर्ड्स फॉर फूड प्रोसेसिंग इंडस्ट्रीज), ट्रेनिंग प्रोग्राम (फूड सेफ्टी मॅनेजमेंट सिस्टीम) आणि फूड टेक्नॉलॉजी व न्यूट्रिशन या क्षेत्रामध्ये एकत्रित संशोधन करण्याचे ठरविण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे समन्वयक डॉ. ए. के. साहू, कॉलेज ऑफ नॉन कन्व्हेन्शनल व्होकेशनल कोर्सेस फॉर वुमेनचे प्राचार्य डॉ. ए. आर. कुलकर्णी, डिपार्टमेंट ऑफ फूड टेक्नॉलॉजीच्या विभागप्रमुख प्रा. स्नेहल खांडेकर, डॉ. अभिजित गाताडे, प्रा. अश्विनी रायबागकर, आदी उपस्थित होते.

लोकमत



शिवाजी विद्यापीठात डॉ. अश्विनी पाटील लिखित दोन पुस्तकांचे प्रकाशन कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी डावीकडून अमोल कांबळे, भारती पाटील उपस्थित होत्या.

लोकमत

# समूह संवादाचे उत्कृष्ट प्रारुप तयार करा : शिंदे

## अश्विनी पाटील लिखित पुस्तकांचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क


कोल्हापूर : मानसशास्त्र विभागाच्या वतीने समूह संवादाचे उत्कृष्ट प्रारुप (मॉडेल) तयार करुन शिवाजी विद्यापीठाला सादर करावे. ज्यामुळे विद्यार्थी, शिक्षकांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण होईल. त्याचप्रमाणे व्यक्तिगत जीवनातही नात्यातील विश्वास हा कृतीतून सिद्ध करुन दाखवावा. सदैव सकारात्मक राहावे, असे आवाहन कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी येथे केले.

विद्यापीठातील मानसशास्त्र विभागात डॉ. अश्विनी पाटील लिखित 'दैनंदिन मानसशास्त्र' आणि 'रिझिलियन्स ऑफ अडोलसन्स' या पुस्तकांच्या प्रकाशनावेळी ते बोलत होते. कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, आई-वडिलांशी संवाद स्थापित करावा. वास्तववादी जीवनाची अभ्यासक्रमाशी सांगड घालून आयुष्य आनंदमय बनवावे.

भौतिकवादी युगात माणसांच एकमेकांशी संवाद कमी होत चालला असून, याच्या परिणाम नैराश्य आणि विकृतीत वाढ होत आहे अशा काळात मानसशास्त्रविषयक लिखाणाला जगभरात मागण वाढत आहे. या पार्श्वभूमीवर, डॉ. अश्विनी पाटील यांची पुस्तके भविष्याचा मानसशास्त्रीय वेध घेण्यास खूपच दिशादर्शक ठरणार आहेत.

या कार्यक्रमावेळी जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त मानसशास्त्र विभागात विविध विषयांवरील पोस्टर प्रदर्शन भरविण्यात आले होते. विभागप्रमुख डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. पाटील यांनी आभार मानले. यावेळी प्रा. अमोल कांबळे यांच्यासह विद्यापीठाच्या विविध विभातील विद्यार्थी उपस्थित होते.

पुढारी



कोल्हापूर : विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षेचे महाविद्यालयात पेपर लिहिताना विद्यार्थी. (छाया : तय्यब अली)

# बी.ए., बी.एस्सी. परीक्षेला लाखाहून अधिक विद्यार्थी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षांतर्गत बुधवारी बी.ए.,बी.एस्सी. च्या परीक्षांना प्रारंभ झाला. विद्यापीठ कार्यक्षेत्रातून सुमारे एक लाखाहून अधिक विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

विद्यापीठ सत्र परीक्षांना सुरुवात झाली आहे. बुधवारपासून मोठी विद्यार्थी संख्या असलेल्या बी.ए., बी.एस्सी. सत्र २ व ५ च्या परीक्षा सुरू झाल्या. महाविद्यालय परिसरात गर्दी पाहायला मिळाली. सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील महाविद्यालयात ७० विषयांचे पेपर झाले. बी.ए.साठी १४०, तर बी.एस्सी.साठी १२० परीक्षा केंद्रे होती. विद्यापीठ कार्यक्षेत्रात सर्व परीक्षा सुरळीपतपणे पार पडल्या, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी.आर.पळसे यांनी दिली.

# उद्या 'बेटी बचाओ अभियान' कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ 'बेटी बचाओ' अभियानांतर्गत 'एम एचआरडी' संचलित टिचिंग लर्निंग सेंटर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार (दि. १८) रोजी सकाळी दहा वाजता मानव्यशास्त्र सभागृहात महाविद्यालय, विद्यापीठातील शिक्षकांसाठी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी केले आहे.